# आनंद, संघर्षाच्या आठवणींना उजाळा

## विद्यार्थी सहायक समितीच्या माजी विद्यार्थ्यांचा रौप्यमहोत्सवी मेळावा

**पुणे, ता. २३ :** 'मी या खोलीत राहत होतो', 'अगं, किती दिवसांनी भेटतीयेस', 'लग्न झाले का रे', 'त्या वेळी आपण किती दंगा करायचो रे', 'योगाची बॅच आठवते का?', 'आपण केलेल्या नाटकावेळी खूप मजा आली होती', अशा संवादांनी, गळाभेटी अन्‌ हस्तांदोलनाने लजपतराय विद्यार्थी भवनाचा परिसर स्मरणरंजनात दंग झाला होता. अनेक वर्षांनी भेटलेले सवंगडी संस्थेतील वास्तव्याच्या आठवणींचा पट उलगडत होते. त्याच वेळी पुनःपुन्हा भेटण्याचे प्रॉमिसही दिले-घेतले जात होते.

विद्यार्थी सहायक समितीच्या माजी विद्यार्थी मंडळाचा रौप्यमहोत्सवी मेळावा रविवारी झाला. या प्रसंगी 'सकाळ'चे व समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, माजी विद्यार्थी आणि 'माय विश्व' कंपनीचे मंदार जोगळेकर, कार्यकारी विश्वस्त वसुधा परांजपे, मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत कुलकर्णी, प्रा. अरुणा औटी-ठुबे आदी उपस्थित होते.

परांजपे म्हणाल्या, "समितीतून बाहेर पडलेले विद्यार्थीच समितीची खरी संपत्ती आहे. माजी विद्यार्थ्यांनी आजी विद्यार्थ्यांची जबाबदारी स्वीकारून त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी पुढाकार घ्यावा. माध्यमे, तंत्रज्ञानाचा वाढता वापर, सामाजिक स्थितीमुळे विद्यार्थ्यांचे चित्त विचलित होऊ नये, यासाठी प्रयत्न व्हावेत."

जोगळेकर म्हणाले, "समितीने माझ्यातला उद्योजक घडविला. आंत्रप्रेन्युअरशिपला प्रोत्साहन देणारी ही कार्यशाळा आहे. त्यात घडलेल्या विद्यार्थ्यांची माहिती संकलित केल्यास स्फूर्तिदायक ठरेल." औटी-ठुबे यांनीही मनोगत व्यक्त केले. यंदाच्या मेळाव्यातील भोजनाचा खर्च करमाळा तालुक्यातील विद्यार्थ्यांनी उचलला, तर पुढील वर्षी मेळाव्याचा संपूर्ण खर्च शिरूर तालुक्यातील माजी विद्यार्थी करणार आहेत.

मंडळातर्फे रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त 'सकाळ'चे संशोधन व विकास संपादक विश्वास देवकर यांच्यासह विविध क्षेत्रांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या २५ माजी विद्यार्थ्यांना पवार यांच्या हस्ते गौरविण्यात आले. विश्वस्त प्रभाकर पाटील यांनी कार्याची माहिती दिली. मंडळाचे कार्यवाह डॉ. प्रसाद अंबीकर, माजी विद्यार्थिनी सुनीता पाटील यांनी सूत्रसंचालन केले. साडेतीनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी मेळाव्याला सहकुटुंब हजेरी लावली.

### माणूस घडविणारी प्रयोगशाळा

"विद्यार्थी सहायक समितीने आजवर अनेक विद्यार्थ्यांना घडविले. माणूस म्हणून समाजात वेगळे स्थान निर्माण करण्याची शिकवण, संस्कार दिले. माणूस घडविणारी ही एक प्रयोगशाळा आहे," असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रवीण दवणे यांनी केले. ते म्हणाले, "समितीने दिलेल्या शिकवणीच्या, संस्कारांच्या अनेक आठवणी माजी विद्यार्थ्यांच्या मनात दाटून येतात. या आठवणींचे एक सुंदर पुस्तक व्हावे. त्यामुळे सध्या समितीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल, तसेच समितीचा नावलौकिक उंचाविण्यासाठी मदत होईल."

### विद्यार्थ्यांनी कर्तव्यदक्षता विसरू नये

**भारत सरकारतर्फे प्रतापराव पवार यांना 'पद्मश्री' जाहीर झाल्याबद्दल समिती परिवाराने त्यांचा सत्कार केला. या प्रसंगी ते म्हणाले, "मी ज्या संस्थांमध्ये काम करतो, तेथील कर्मचाऱ्यांमुळे हा पुरस्कार मिळाला आहे. समितीने अनेक विद्यार्थ्यांना घडविले. आणखी खूप विद्यार्थ्यांना समितीची गरज आहे. मात्र, संख्या वाढल्याने अडचणी येत आहेत. या कार्यात अधिकाधिक माजी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्यास कमीत कमी खर्चात विद्यार्थ्यांची सोय होईल. विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक शिक्षणावर भर देत मिळेल त्या संधीचा लाभ घ्यायला हवा. संस्कार, माणुसकी आणि कर्तव्यदक्षपणा कधीही विसरता कामा नये."**